MHPU180026052021

नि. ५ वरील आदेश
(दिनांक २३.०५.२०२३)

१. प्रस्तुत अर्ज अर्जदारांतर्फे महिलांचे कौटुंबिक हिसांचारापासुन संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ कलमा अंतर्गत अर्जदार क्र. १ व २ यांना अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जदाराच्या विनंतीमध्ये अर्जदार क्र. १ यांना प्रतिमहा रक्कम रु.५,०००/- व अर्जदार क्र. २ यांना प्रतिमहा र.रु. २,५००/- असे एकुण र.रु. ७,५००/- अशी अंतरिम पोटगी देण्याचे आदेश व्हावेत अशी त्यांनी विनंती केली आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ व जाबदेणार क्र. १ पत्नी-पती असुन त्यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे व जातीरिवाजाप्रमाणे दि. २७/११/२०११ रोजी अर्जदार क्र. १ चे मामा ज्ञानदेव बाबा शेळके यांचे निंबोडी (पानमळा), ता. खंडाळा, जि. सातारा येथे झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही जाबदेणाराच्या घरी निंबोडी येथे त्यांच्या एकत्र कुटूंबात नांदण्यास गेली. तेथे जाबदेणार क्र. १ ते ३ एकत्रात राहात होते. लग्नानंतरचे धार्मिक विधी पार पाडल्यानंतर अर्जदार क्र. १ चार पाच दिवस माहेरी आली. जाबदेणार क्र. २ हे अर्जदार क्र. १ ला घरी नांदावयास घेऊन गेले. जाबदेणार क्र. १ लग्नानंतर सुमारे एक महिना गावी निंबोडी येथे अर्जदारासह राहिले. त्यानंतर ते मुंबईला त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी गेले. जाबदेणार क्र. २, ३, धाकटे दिर यांच्यासह अर्जदार क्र. १ या कोळेकर वस्ती, निंबोडी येथे राहायला लागल्या. जाबदेणार क्र. ४ अर्जदाराची नणंद ही निंबुतछपरी येथे नांदत असतात, त्या वेळोवेळी निंबोडी येथे घरी येत जात असत. जाबदेणार क्र. २ व ३ यांच्या राहत्या वस्तीवरुन अर्धा तास अंतरावर त्यांचे चार एकर बागायत क्षेत्र आहे. तेथे अर्जदार क्र. १ यांना जाबदेणार क्र. २ व ३ हिला रोज घरातील सर्व कामे उरकुन, दोन जरसी गाईंच्या गोठ्याचे काम करुन त्यांचेसोबत शेतात दिवसभर काम करण्यासाठी घेऊन जात असे. कामे उरकता उरकता थोडा उशीर झाला तर जाबदेणार क्र. २ व ३ हे तिला घालुन पाडुन बोलुन छळत असत. जाबदेणार क्र. १ महिन्यातुन चार दिवस गावी येऊन राहत असे व पुन्हा मुंबई येथे जात होते. पहिले दोन ते तीन महिने जाबदेणार क्र. १ ते ३ यांनी अर्जदारास ब-यापैकी नोंदविले. जाबदेणार क्र. १ हे मुंबईवरुन चार दिवसांसाठी गावी आले तर जाबदेणार क्र. २ व ३ त्यांचे कान भरीत असत व अर्जदाराविषयी शेतातील काम करत नाही, घरचे काम नीट पाहत नाही असे सांगत असत. ते एकुन जाबदेणार क्र. १ हे अर्जदार क्र. १ यांना रागावत असत, तिला दोन-दोन दिवस उपाशी ठेवा म्हणजे ती जागेवर येईल. तिची मुंबई येथे वस्तीवरच करु अशी धमकी देऊन अर्जदार क्र. १ यांना वेळोवेळी जबरदस्त मारहाण करीत असे. अर्जदार जाबदेणारांचा जाच, हाट, छळ, मारहाण व भिती सहन करीत त्यांच्याकडे नांदण्यास होत्या.

अर्जदार क्र. १ यांना सासरी नांदत असता मुलबाळ होत नाही म्हणुन जाबदेणार क्र. १ ते ४ हे अर्जदार क्र. १ यांना वेळोवेळी छळत होते, तिला नेहमी तु वांझोटी आहे, तुला मुलबाळ होणार नाही असे म्हणुन जाच, हाट करुन तु दुसरे लग्न करायला आनंदला परवानगी दे असे वेळोवेळी म्हणुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करीत असत. अर्जदार क्र. १ यांचा जाबदेणार क्र. १ बरोबर संसार व्हावा म्हणुन अर्जदार यांचे गावी त्यांना मुंबईला नेले नाही तरी नांदत होत्या. लग्नानंतर सुमारे चार वर्षांनंतर अर्जदार क्र. १ ला दिवस गेले. त्या काळात जाबदेणारांनी अर्जदाराची कोणतीही चौकशी केली नाही. देखभाल केली नाही. दवाखाना उपचार केला नाही. ओटी भरण्याचे नाव घेतले नाही. नवव्या महिन्यात अर्जदार क्र. १ ला माहेरी वाटलुज येथे बाळंतपणास पाठविले. दि. १९.०८.२०१६ रोजी अर्जदार क्र. १ ला मुलगी

झाली. तिचे नाव शिवांगी आहे. मुलगीच का झाली, मुलगा का झाला नाही, म्हणुन जाबदेणार क्र. १ ते ४ नाराज झाले. त्यांनी अर्जदार व लहान बाळाची कोणतीही काळजी घेतली नाही बाळंतपणाचा, सिझर झाली की घरीच बाळंत झाली याची चौकशी केली नाही, बाळंतपणाचा खर्च केला नाही. बाळंतपणानंतर जाबदेणार क्र. २ हे अर्जदार व त्यांच्या लहान बाळास सुमारे तीन महिन्यांनंतर निंबोडी गावी घेऊन गेले. अर्जदार लहान मुलीसह सासरी नांदु लागल्या. जाबदेणार क्र. १ महिन्यातुन चार पाच दिवस मुंबईहुन गावी जात होते. त्या काळात पुन्हा अर्जदार क्र. १ यांना पुन्हा दिवस गेले. पुन्हा अर्जदार क्र. १ ला बाळंतपणासाठी माहेरी वाटलुज येथे पाठवुन दिले. त्यावेळी थोरली मुलगी शिवांगी खुप लहान असुन देखील जाबदेणारांनी तिला अर्जदार क्र. १ सोबत माहेरी पाठवुन दिले नाही. तिला तिचे व अर्जदार क्र. १ चे मनाविरुध्द जाबदेणारांनी त्यांच्याकडेच ठेवुन घेतले. त्यामुळे अर्जदारास मानसिक त्रास झाला. अर्जदारास जाबदेणार हे त्यांचे आई नातेवाईक यांच्याबरोबर कधीही मोबाईलवर बोलु देत नव्हते. दि. ०६.११.२०१७ रोजी अर्जदार क्र. २ समृध्दीचा जन्म झाला. दुसरीपण मुलगीच झाली, मुलगा झाला नाही याचा राग धरुन अर्जदार क्र. १ यांना त्यांच्या बाळंतपणानंतर सुमारे पाच महिन्यांनी जाबदेणार निंबोडी गावी घेऊन गेले. त्यावेळी अर्जदार क्र. १ त्यांच्याकडे एक वर्ष नांदल्या. त्या काळात जाबदेणार क्र. १ ते ४ हे सर्व तिला तुला मुली होतात, मुलगा होत नाही या कारणावरुन पुन्हा पहिल्यापेक्षा जास्त जाच, हाट करु लागले. जाबदेणार क्र. १ हे देखील तिला मारहाण करण्याचे प्रमाण वाढले. ते अर्जदार क्र. १ कडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष करीत असत. आजारी पडली तरी डॉक्टरांकडे उपचार करीत नसत. दुस-या लग्नाला संमती दे असे म्हणुन तिला त्रास देत असत. दिवाळीचा सण आला त्यावेळी अर्जदार क्र. १ यांना माहेरी जायचे होते. जाबदेणार हे तिला माहेरी पाठवित नाही म्हणुन त्यांच्या सांगण्यावरुन अर्जदार क्र. १ ने तिच्या वडीलांना बोलावुन घेतले व पंधरा दिवसांनी जाबदेणार क्र. १ यांना न्यायला पाठवा, मी येते असे सांगितले तरीदेखील अर्जदार क्र. १ यांची थोरली मुलगी शिवांगीला अर्जदाराबरोबर पाठविले नाही. जाबदेणारांनी जाणिवपुर्वक व हेतुपुरस्सर मायलेकीची ताटातुट केली. पंधरा दिवसांनंतर वेळोवेळी अर्जदार क्र. १ ने जाबदेणार यांना न्यायला या असे सांगुन देखील कोणीही नेण्यास आले नाही. दोन अडीच वर्षांपासुन अर्जदारास कोणीच नेण्यास आले नाही. जाबदेणार क्र. १ हे अर्जदार क्र. १ चा फोन देखील उचलत नाही. जर फोनवर बोलले तर शिवीगाळ करुनच सुरुवात करतात व दुस-या लग्नाला परवानगी मागतात. जाबदेणार क्र. १ व ४ हे अर्जदाराच्या माहेरी दोन महिन्यांपुर्वी आले होते तेव्हा त्यांनी सारीकाला नेणार नाही, सोडचिठ्ठी द्या अशी धमकी देऊन शिवीगाळ करुन ते दोघे निघुन गेले. त्यामुळे अर्जदाराने दि. २९.११.२०२१ रोजी वकीलामार्फत नांदवण्यास नेण्याबाबत नोटीस पाठविली. त्या नोटीशीला जाबदेणार क्र. १ यांनी कोणत्याही प्रकारे उत्तर दिले नाही अथवा न्यायला आले नाही. उलट जाबदेणार क्र. २ यांनी अर्जदाराच्या नोटीशीला खोट्या मजकुराचे उत्तर दिले. नव-याची सर्व जबाबदारी मी घेतो आहे असे बेफिकीरपणे वर्तन केले व शेतात काम करायला बाई मिळेल अशा समजुतीने रु.१०००/- मनीऑर्डर पाठविले. जाबदेणार यांनी अर्जदारांची दोन ते अडीच वर्षांपासुन कोणतीही काळजी घेतली नाही. त्यांचे कपडा लत्ता, दवाखाना, संगोपन, उदरनिर्वाहाकामी कधीही पैसे देऊन कोणतेही कर्तव्य पार पाडलेले नाही. अर्जदार हे त्यांच्या मनाविरुध्द अर्जदार क्र. १ च्या माहेरी येथे राहात आहे. अर्जदार उपाशीपोटी राहुन दिवस काढत आहे. अर्जदारास स्वतःचे असे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही, निवासाची सोय नाही. आईवडीलांची घरची परिस्थिती हालाखीची व गरीबीची असुन त्यांना त्यांचाच उदरनिर्वाह करणे शक्य होत नाही.

याउलट जाबदेणार क्र. १ यांची आर्थिक स्थिती चांगली आहे, ते नोकरी करतात. त्यांना वार्षिक उत्पन्न रु. २,५०,०००/- आहे. तसेच निंबोडी गावी चार एकर शेतीबाडी बागायती आहे. जाबदेणार यांची अंतरिम पोटगी देण्याची ऐपत आहे. मुळ अर्जाचा गुणदोषावर अंतिम निकाल लागणेस बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात अर्जदारांना अंतरिम पोटगी न दिल्यास त्यांना उपाशीपोटी राहावे लागेल व उपासमारीची वेळ त्यांच्यावर

येईल. या सर्व कारणास्तव त्यांनी त्यांचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. जाबदेणार क्र. १ ते ४ यांना नोटीसची बजावणी झाल्यानंतर ते प्रकरणात हजर झाले त्यांनी त्यांचा जबाब नि.१२ अन्वये दाखल केलेला आहे. जाबदेणार यांनी अर्जदारासोबत असलेले नाते संबंध स्वीकारले. तसेच ते मुंबई येथे मजुरी करतात व गावी महिन्यातुन दोन ते तीन वेळो ये-जा करतात हे मान्य केले आणि अर्जदारांनी अर्जामध्ये केलेले सर्व आरोप नाकारले. त्यांचे असे कथन आहे की, अर्जदार ही त्यांच्याकडे नांदावयास आली होती. सुरुवातीचे काही महिने कसेतरी नांदत होती. जाबदेणार यांचे कुटूंबात ७-८ माणसे असुन दररोज शेतीच्या कामावर जातात. जाबदेणारांना तुटपुंजी शेती असल्याने सर्व कुटूंबाची शेतीवर गुजराण होत नाही. म्हणुन ते मुंबई येथे मजुरी करतात व कुटूंबाला मदत करतात. अर्जदार क्र. १ चा स्वभाव हट्टी आहे. तिला निंबोडीत राहावयाचे नाही. शिवाय तिला जाबदेणार क्र. १ ने सोबत मुंबईला घेऊन जावे व तेथे खोली करुन ठेवावे असे हट्ट करीत आहे. सदरचा हट्ट पुरविणे व अर्जदारास मुंबईला घेऊन राहावे जाबदेणार यांना परवडणारे नाही. जाबदेणार क्र. ४ ही तिच्या सासरी नांदत असुन कधीतरी महत्वाचे कार्य व सणाच्या वेळी निंबोडी येथे येत असते. तिचा कोणताही सहभाग अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांच्या संसारात नव्हता व नाही. केवळ तिला त्रास देण्याच्या उद्देशाने तिचे नाव या खटल्याव गोवले आहे. जाबदेणार क्र. १ वर दबाव आणण्याचा प्रयत्न अर्जदार करीत आहे. जाबदेणार क्र. २ व ३ हे दुस-याच्या शेतात जाऊन मोलमजुरी करतात. त्यांच्याकडे चार एकर क्षेत्र नाही, जरसी गाई नाहीत. शिवाय अर्जदारास दिवसभर काम करण्याचा, घालुन पाडुन छळ करण्याचा प्रश्न आलेला नाही. जाबदेणारांनी अर्जदाराचा कधीही छळ केलेला नाही, अगर दुस-या लग्नाला परवानगीही मागितलेली नाही. तसेच तु वांझोटी आहे, तुला मुलबाळ होणार नाही, त्यामुळे दुस-या लग्नाला परवानगी मागितलेली नाही. जाबदेणारांनी अर्जदाराचे गरोदरपणाचे दिवस गेल्यानंतर तिची योग्य ती काळजी व देखभाल घेतली असुन अर्जदारास नवव्या महिन्यात अर्जदाराचे वडील बाळंतपणास वाटलुज येथे घेऊन गेले. मुलगी अगर मुलगा होणे हे कोणत्याही स्त्रीच्या हातात नसते याची पुर्ण माहिती जाबदेणार यास असल्याने मुलगीच झाली मुलगा का झाला नाही असे म्हणुन नाराज होण्याचा व त्या अनुषंगाने काळजी घेणे, बाळंतपणाचा खर्च वगैरे बाबतची चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवलेला नाही. जाबदेणार क्र. १ याने शिवांगीचा जन्म झाल्यानंतर तिला पाहणेसाठी गेल्यानंतर योग्य ती खर्चाची रक्कम अर्जदार क्र. १ कडे दिलेली होती. अर्जदार क्र. १ ला दुस-यांदा दिवस गेल्याने अर्जदाराचे वडील तिला वाटलुज येथे माहेरी घेउन गेले. लहान मुलगी असल्याने व अर्जदार गरोदर असल्याने लहान मुलीचा सांभाळ करता येणार नाही करीता अर्जदारानेच शिवांगीला जाबदेणार क्र. २ व ३ कडे सांभाळ करणेस स्वतः ठेवले होते. अर्जदाराचे वडील ज्या ज्या वेळी अर्जदारास भेटणेस अगर माहेरी नेणेस येत होते त्या त्या वेळी अर्जदारास जाबदेणार हे माहेरी पाठवित होते. अर्जदार ही स्वतःहुन जाबदेणारांचा त्या करुन स्वखुशीने माहेरी राहत असल्याने जाबदेणार यांनी वाटलुज येथे वेळोवेळी जाऊन नांदावयास आणण्याचा प्रयत्न करुनही जाणिवपुर्वक अटी घालुन अर्जदार हीच नांदत नसल्याने फोन न उचलण्याचा अगर शिवीगाळ करण्याचा व दुस-या लग्नाला परवानगी मागण्याचा प्रश्न उद्भवलेला नाही.

अर्जदारास नांदावयास आणणेकरीता जाबदेणार क्र. १, २, ४, सखाराम दिनकर, कोळेकर, दादा जयराम शेळके व विठ्ठल गंगाराम कुंभार हे मौजे वाटलुज येथे गेलेले होते. त्यावेळी अर्जदार क्र. १ व तिचे आईवडील यांनी अर्जदारास मुंबई येथे नेणार असला तरच नांदावयास पाठवु असे म्हटले त्यावेळी जाबदेणार क्र. १ यांनी मुंबईला आर्थिक कारणावरुन नेण्याची असमर्थता दाखविली व निंबोडी येथेच वेगळी खोली करुन ठेवण्याची व अन्न, वस्त्र व औषधे घेण्याची जबाबदारी तयारी दर्शविली. त्यास अर्जदार व तिचे आईवडील यांनी नकार दिल्याने जाबदेणार व साक्षीदार मोकळ्या हाताने परत आले. अर्जदाराने तिचे वकील ॲड. देशमुख यांच्यामार्फत दि. २९.११.२०२१ रोजी नोटीस पाठविली होती. त्या नोटीशीस

जाबदेणार क्र. १ व २ यांनी रितसर नोटीस उत्तर पाठविले होते व त्यासोबत अर्जदारास एस.टी. खर्च व इतर खर्चाकरीता रु. १०००/- ची मनीऑर्डर केली होती. ते नोटीस उत्तर व मनीऑर्डर अर्जदाराला मिळालेले आहे.

जाबदेणार यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदाराच्या आईवडीलांना अर्जदाराशिवाय दुसरी मुलगी सौ. वर्षा धनंजय ढेंगील, रा. धर्मकोळी, ता. माळशिरस, जि. सोलापुर हिच्या नव-याच्या घरची आर्थिक परिस्थिती चांगली असुन ती तिच्या माहेरी राहणे शक्य होत नाही. अर्जदाराचे आईवडीलांना दोन मुली असुन मुलगा नाही. शिवाय अर्जदाराचे आईवडीलांना स्वतःची शेती आहे. घरचे शेतीत काम नसेल तेव्हा अर्जदाराचे आईवडील अर्जदारासह इतर दुस-या लोकांकडे रोजंदारीने कामावर घेऊन जात असतात. अर्जदारास तिच्या आईवडीलांनी लहानपणापासुन लाडात वाढविलेले आहे. जाबदेणार यांनी वेळोवेळी अर्जदारास वाटलुज येथे जाऊन शक्य तेवढी आर्थिक मदत केलेली आहे. अर्जदाराचे आईवडील धडधाकट असुन आजारी नाहीत. अर्जदाराने स्वतःहुन जाबदेणार यांचा त्याग केलेला आहे. अर्जदार व तिचे आईवडील संगोपन करण्यास समर्थ आहे. अर्जदार ही स्वतः कामधंदा करुन स्वतःला सांभाळण्यास समर्थ आहे. अर्जदारास सदरचा अर्ज दाखल करणेस कोणतेही कारण घडलेले नसल्याने जाबदेणार यांना वेठीस धरुन अर्जदार क्र. १ ही स्वतःचे इच्छेप्रमाणे व मर्जीप्रमाणे जाबदेणार यांना वागणेस भाग पाडणेकरीता खोटे अर्जाची रचना केली असल्याने अर्जदाराचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. जाबदेणार यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असुन अर्जदार क्र. १ हीला दरमहा रु. ७,०००/- व अर्जदार क्र. २ ही रु. ५,०००/- असे एकुण रु. १२,०००/- देण्याची ऐपत नाही. जाबदेणार यांनी अर्जदाराचा कौटूंबिक, शारिरीकी व मानसिक असे कोणतेही नुकसान केलेले नाही. एकत्र कुटूंबात नांदण्याची अर्जदार क्र. १ हीस इच्छा नसेल तर निंबोडी येथे अर्जदाराची स्वतंत्र खोली देउन अन्न, वस्त्र, औषधपाणी याची सोय करण्याची तयारी जाबदेणार क्र. १ यांची असुन अर्जदार यांना नांदावयास नेणे ते पुर्वीपासुन तयार होते व ते आजही आहे. केवळ जाबदेणार यांना खर्चात टाकण्यासाठी व त्यांच्यावर दडपण आणुन स्वतःच्या मर्जीप्रमाणे राहता यावे व वागता यावे याकरीता खोट्या अर्जाची रचना केली असल्याने अर्जाच्या कामी उचलुन पोटगी देण्याची जाबदेणाराची ऐपत नाही. या सर्व कारणास्तव त्यांनी अर्जदाराचा अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्ज व जबाब वाचला व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. बी.व्ही.देशमुख व जाबदेणार यांच्यातर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस.एम.नरुटे यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला. जाबदेणार तर्फे लेखी युक्तिवाद नि. १८ चे अवलोकन केले. अर्जदाराचे नि. १५ तसेच जाबदेणार यांचे नि. १७ वर दाखल उत्पन्न व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्रांचे अवलोकन केले.

६. अर्जदाराने अभिलेखावर नि. ३ यादीलगत दि. २९.११.२०२१ रोजी जाबदेणार क्र. १ व २ यांना पाठविलेली नोटीस, जाबदेणार क्र. १ व २ यांच्या वकीलांनी त्या नोटीशीस पाठविलेले नोटीस उत्तर. तसेच यादी नि. १६ लगत मौजे निंबोडी गट क्र. ३८० चा ७/१२ उतारा, मौजे निंबोडी, ता. खंडाळा येथील गट क्र. १६३ चा ७/१२ उतारा इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. नि. ७ अन्वये संरक्षण अधिकारी, ता. दौंड, जि. पुणे यांनी कौटुंबिक घटना अहवाल दाखल केलेला आहे. याउलट जाबदेणार यांनी त्यांच्या कथनापुष्टर्थ काहीही दाखल केलेले नाही.

अर्जदाराने नि. १६ लगत दाखल मौजे निंबोडी गट नंबर १६३ चा ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता त्यामध्ये खाते क्रं. १६४ नुसार जाबदेणार क्रं. २ यांच्या नावे ०.६५.५० आर इतके क्षेत्र असल्याचे दिसून येते. त्यातच सन २०१७ ते २०१९ साली भोगवटदार यांनी ज्वारीचे पिक घेतल्याचे तसेच ०.२ आर क्षेत्र पड असल्याचे दिसून येते. तसेच मौजे निंबोडी येथील गट नंबर ३८० चा ७/१२ उतारा याचे अवलोकन केले असता त्यामध्ये खाते क्रं. ४५३३ नुसार जाबदेणार क्रं. १ यांचे नावे ०.२२ आर इतके क्षेत्र असल्याचे दिसून

येते. त्यात २०१७ ते २०१९ साली भोगवटदार यांनी ज्वारी पिक घेतल्याचे तसेच ०.०२ आर इतके विहिरपड क्षेत्र असल्याचे दिसून येते. असे जरी असले तरी त्याला शेतीतील उत्पन्न मिळत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. जाब देणार यांनी दाखल केलेले मालमत्ता, उत्पन्न व खर्च याबाबतचे शपथपत्रे नि. १७ चे अवलोकन केले असता कलम ई उत्पनाची माहिती (३) मासिक पगारमध्ये दररोज पगार ५००/- रुपये असे नमूद केल्याचे तसेच त्यांची वैयक्तीक माहिती या कलमातील (७) मासिक खर्च एकूण ६,५००/- असल्याचे नमूद केले आहे व जाबदेणाराकडे त्यांची मोठी मुलगी शिवांगी आहे. त्यावर अंदाजे होणारा खर्च २०००/- दर्शविला आहे. तसेच कलम ऊ दायित्वाचा तपशिलमध्ये जाबदेणारमध्ये सोसायटी कर्ज, पिक कर्ज २०,०००/- याबाबी नमूद केलेल्या आहे. परंतु जाबदेणार यांनी कर्ज संबंधीचे कागदपत्र दाखल केलेले नाही. याव्यतिरिक्त जाबदेणार कलम ऐ मध्ये अर्जदार दरमहा ५,५००/- रुपये कमविते असे नमूद केलेले आहे. त्यासंदर्भात जाबदेणार यांनी कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.

अर्जदाराचे मालमत्ता, उत्पन्न व खर्च बाबत नि.१५ चे अवलोकन करता तिच्या सोबत अर्जदार क्रं. २ समृध्दी मुलगी असून तिचे वय ५ वर्ष असल्याचे नमूद केले आहे. तिचे शिक्षण दहावीपर्यत झाल्याचे नमूद केले आहे.

याव्यतिरिक्त अर्जदार क्रं. १ व २ हे दिवाळी २०१९ पासून अर्जदार क्र.१ च्या माहेरी राहत आहे. तेव्हापासून जाबदेणार क्रं. १ यांनी अर्जदार क्रं. १ व २ यांच्या अन्न,वस्त्र व निवा-याची व्यवस्था केल्याचे दिसून येत नाही. नि. ७ वरील संरक्षण अधिकारी दौंड यांनी दाखल केलेल्या कौटूंबिक घटना अहवाल ते वाचून घेतले असता अर्जदाराच्या कथनास पुष्टी मिळते. त्यावरुन प्रथमदर्शनी अर्जदार क्रं. १ वर जाबदेणार यांनी कौटूंबिक हिसांचार केल्याचे दिसून येते. अर्जदार क्र.१ व २ यांची पालनपोषणाची प्राथमीक, नैतिक जबाबदारी ही जाबदेणार क्र.१ वर आहे. जाबदेणार क्र.१ चे उत्पन्न व अर्जदारांचे राहणीमान विचारात घेता जाबदेणार अर्जदारांना अंतरिम पोटगी देण्यास सक्षम व समर्थ असल्याचे दिसुन येते. अर्जदार क्र. १ ला रक्कम रु.५,०००/- तसेच अर्जदार क्र. २ यांना दरमहा २५००/- इतकी अंतरिम पोटगी/उदरनिर्वाह अशी एकुण रुपये ७,५००/- मागणी केलेली आहे. परंतु सदर मागणी अवास्तव असल्याचे दिसुन येते. जाबदेणार क्रं. १ यांच्या कथनानुसार अर्जदार ही स्वतःहून तिच्या माहेरी राहत आहे किंवा तिला निंबोडी येथे नांदायचे नव्हते या बाबींच्या सिध्दतेसाठी प्रकरण गुणदोषावर चालविणे आवश्यक आहे त्यासाठी लागणारा वेळ, अर्जदारांचा उदरनिर्वाह व प्राथमिक गरजा भागविण्यासाठी लागणारा खर्च म्हणून अर्जदारांना दरमहा अंतरिम पोटगी जाबदेणार क्रं. १ कडुन मिळणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून अर्जदारांना अंतरिम पोटगी म्हणून आर्थिक मदत देणे योग्य व न्योचित होणार आहे. करीता आदेश खालील प्रमाणेः-

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येते.

२. जाबदेणार क्र.१ ने अर्जदार क्र.१ ला दरमहा अंतरिम पोटगी रुपये ३०००/- तसेच अर्जदार क्र. २ हिस रक्कम रुपये २०००/- म्हणजे एकुण रक्कम रु.५,०००/- (रक्कम रु. पाच हजार फक्त) प्रस्तुत अर्जाच्या दिनांका पासुन म्हणजे २९.१२.२०२१ पासुन पुढील आदेशापर्यंत देत राहावी.

३. प्रस्तुत आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

Sd/-xxx
**(श्रीमती जे.एस.खेडकर-गोयल)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.१),
ता.दौंड, जि.पुणे

दिनांक – २३.०५.२०२३
दौंड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per the original order.

Name of Steno :- D. R. Kore
Court name :- Smt. J.S.Khedkar-Goyal, J.M.F.C., Daund
Tq.Daund, Dist. Pune
Date :- 23.05.2023
Signed by P.O. On :- 23.05.2023
uploaded on :- 24.05.2023